# <u>महात्मा गांधी</u>



महात्मा गांधी हे भारताच्या <u>स्वातंत्र्य-लढ्यातील</u> एक थोर नेता होते. त्यांना लोक प्रेमाने गांधीजी अथवा बापू म्हणत. बापू म्हणजे पिता. गांधीजींना लोक साऱ्या देशाचा पिता, म्हणजेच "<u>राष्ट्रपिता</u>" मानत.

गांधीजींचे नाव होते मोहनदास गांधी. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजराथ राज्यात झाला. गांधीजींना <u>वकील</u> व्हायचे होते. गांधीजी शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तिथे वकीलीचे शिक्षण पूर्ण करून ते भारतात परत आले.

त्यानंतर गांधीजी काही कामासाठी साउथ आफ्रिकेला गेले. त्याकाळी भारत स्वतंत्र नव्हता. भारतावर इंग्रज लोकांचे राज्य होते. तसेच साउथ आफ्रिकेवर देखील इंग्रज लोकांचे राज्य होते. इंग्रजी राज्यात <u>वर्णभेद</u> होता. साउथ आफ्रिकेतील मूळ आफ्रिकन तसेच तिथे गेलेल्या भारतीय लोकांना <u>दुय्यम</u> वागणूक मिळत असे. एकदा गांधीजी आगगाडीच्या पहिल्या वर्गाने प्रवास करत होते. तेव्हा काही गोऱ्या लोकांनी त्यांना त्या डब्यातून हाकलून दिले. गांधीजींनी या वर्णभेदाच्या विरोधात लोकांना <u>संघटित</u> केले. त्यांनी <u>अन्यायाचा</u> <u>अहिंसेच्या</u> मार्गाने विरोध केला.

पुढे गांधीजी भारतात परत आले. त्यांनी संपूर्ण भारताचा प्रवास केला. लोकांशी <u>संवाद</u> साधला. त्यांना जाणवले की भारतातही इंग्रज लोक तसाच वर्णभेद करत आहेत. गांधीजींनी भारतात देखील लोकांना संघटित करायला सुरुवात केली. ते भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस चे नेता झाले.

त्यानंतर गांधीजींनी "<u>असहकार</u> <u>आंदोलन</u>" सुरु केले. त्यांनी लोकांना सांगितले की आपण या परकीय सरकारला सहकार्य केले नाही तर ते चालूच शकणार नाही. इंग्रजी कायद्यांना विरोध करण्यासाठी त्यांनी प्रसिद्ध दांडी-यात्रा केली. दांडी येथे मूठभर मीठ उचलून त्यांनी मिठावरील कराचा विरोध केला. त्यांनी लोकांना <u>परदेशी</u> वस्तूंऐवजी <u>स्वदेशी</u> वस्तू वापरण्याचा मंत्र दिला. शेवटी १९४२ साली त्यांनी "चले जाव" आंदोलनाची सुरुवात केली. या आंदोलनाने इंग्रज सरकार खिळखिळे झाले. अखेर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.

~~~

© Triveni Marathi Shala, 2018
~~~

१. योग्य शब्द लिहा:

हिंसा, अहिंसा, वर्णभेद, न्याय, अन्याय, असहकार, कायदा, स्वदेशी, परदेशी, स्वतंत्र

| | |
|---|---|
| आपल्या देशावर आपल्याच देशातील लोकांनी राज्य करणे. | |
| आपल्या देशात तयार झालेल्या वस्तू. | |
| अखिलला त्याच्या मित्रांचे मत पटले नाही म्हणून त्याने त्यांच्याबरोबर काम करणे बंद केले. | |
| सर्वांनी कर भरायचा असा नियम आहे. | |
| त्याने काहीही चूक केली नसतानाही त्याला शिक्षा झाली. | |
| दुकानदाराने काळ्या लोकांना दुकानात प्रवेश दिला नाही. | |
| अविला मित्राचे मत पटले नाही म्हणून त्याने मित्राला मारले. | |
| आरोप सिद्ध न झाल्यामुळे त्याला शिक्षा झाली नाही. | |
| अनुजाला नवीन कायदा मान्य नव्हता. म्हणून तिने शांततेने चाललेल्या आंदोलनात भाग घेतला. | |
| दुसऱ्या देशात तयार झालेल्या वस्तू. | |

२. भूतकाळ

| | |
|---|---|
| लोक त्यांना बापू <u>म्हणाले</u>. | लोक त्यांना बापू <u>म्हणत असत</u>. |
| अखिलने अभ्यास <u>केला</u>. | |
| सीता टेनिस <u>खेळली</u>. | |
| राधा गाणे <u>गायली</u>. | |
| सगळे अंगणात <u>खेळले</u>. | |

३. गांधीजींची एक गोष्ट वाचून वर्गात सांगणे. (१० वाक्ये, स्पष्ट, मोठ्यांदा आणि न अडखळता.)

© Triveni Marathi Shala, 2018